# नवी मुंबई महानगरपालिका
# Navi Mumbai Municipal Corporation

कार्यालय : नमुंमपा मुख्यालय, भूखंड क्र. १,
किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर -१५ए,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : ०२२-२७५६ ७०७०/१/२/३/४/५
फॅक्स : ०२२-२७५७७०७०

**Head Office:** Plot No.1,
Near Kille Gaothan, Palmbeach Junction,
Sector 15A, C.B.D. Belapur, Navi Mumbai -400 614.
Tel : 022 - 2756 7070 / 1/2/3/4/5
Fax : 022 - 2757 7070

जा. क्र. नमुंमपा./नरवि./बां.प./प्र.क्र. 20211CNMMC18491/५३४/२०२२
दिनांक -२५/०२/२०२२

प्रति,
**मे.थालिया ॲन्ड गामी एंटरप्रायजेस**
**तर्फे भागीदार मुरजी भानजी गामी,**
भुखंड क्र. १७ व १८, सेक्टर क्र.०२,
घणसोली, नवी मुंबई.

**प्रकरण क्र. 20211CNMMC18491**

**विषय** – **भुखंड क्र. १७ व १८, सेक्टर क्र.०२, घणसोली,** नवी मुंबई या जागेत **निवासी व वाणिज्य** या कारणासाठी सुधारित बांधकाम परवानगी देणेबाबत.

**संदर्भ** - आपला वास्तुविशारद यांचा दि.०१/११/२०२१ रोजीचा प्राप्त अर्ज.

महोदय,

**भुखंड क्र. १७ व १८, सेक्टर क्र. ०२, घणसोली, नवी मुंबई** या जागेत **निवासी व वाणिज्य** या वापराकरीता सुधारित बांधकाम परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस वरील संदर्भाधिन अर्जान्वये प्राप्त झालेला आहे. संदर्भाधिन भूखंडावर **निवासी व वाणिज्य** वापराकरीता सुधारित बांधकाम परवानगी प्रस्तावास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४५(१)(३) मधील तरतुदीनुसार त्याचप्रमाणे शासनाने दि.०२/१२/२०२० च्या अधिसूचनेव्दारे मंजूर केलेल्या आणि दि.०३/१२/२०२० पासून नवी मुंबई मनपा क्षेत्रासाठी लागू असलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार व सदर नियमावलीतील नियम क्र.२.६.१ (i) व (ii) नुसार **निवासी व वाणिज्य** वापर हा अनुज्ञेय आहे. त्यामुळे सदरच्या भूखंडावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम २५३ व २५४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४५(१)(३) मधील तरतुदीनुसार **निवासी व वाणिज्य** प्रयोजनासाठी तसेच सोबतच्या व प्रमाणपत्रातील १ ते ९ अटी व सुधारित बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रातील पुर्तता/पालन करणेचे व खालील अटीसापेक्ष सुधारित बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मंजुर करण्यात येत आहे.

पाणी पुरवठा व मलनिःस्सारण सुविधा आवश्यक शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील.

सार्वजनिक स्वरुपाच्या रस्त्यावर व गटारीत बांधकाम साहित्य पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. अशाप्रकारे बांधकाम साहित्य रस्त्यावर अथवा इतर सार्वजनिक जागेवर आढळुन आल्यास आपणावर कार्यवाही करणेबाबत संबंधित विभागास कळविण्यात येईल किंवा बांधकाम परवानगी रद्द करण्याबाबतची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल याबाबतची नोंद घ्यावी.

बांधकाम सुरु असताना जागेवरील रिकामे गाळे / सदनिका यांची संरक्षणाची जबाबदारी संबंधित जमिनमालक / भुखंडधारक / गाळेधारक यांची राहिल. तसेच अर्धवट बांधलेल्या जागेचा गैरवापर होऊ नये म्हणुन संबंधित भुखंड धारकाने कुंपण भिंत बांधुन त्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. गैरकृत्य करताना आढळल्यास संबंधितांस कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भूखंड सखल भागामध्ये असल्यास जमीनीची पातळी (Ground Level) भरणी करुन उंच करावी. जमीनीची पातळी ही रस्ता आणि Sewer Line यांच्या पेक्षा उंचावर असली पाहिजे. सांडपाणी, पावसाळयाचे पाणी आणि मल यांचा निचरा योग्यपणे होऊन भुखंडामध्ये पाणी साचणार नाही अशी भूखंडाची पातळी तयार करावी.

इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे करण्यात यावे. बांधकामामध्ये फेरफार अथवा वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार सुधारीत बांधकाम नकाशे मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. मंजुर नकाशा व्यतिरिक्त बांधकाम केल्यास ते कायद्यातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कृ.मा.प.---२

इमारतीचे बांधकाम करणारे मजुरांचे निवासीकरीता (Labour Shed) भूखंडाचे हद्दीत आरोग्याच्या दृष्टीकोनातुन त्यांचे तात्पुरते टॉयलेटसह सोय करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूखंडाचे एका बाजुचे सामासिक अंतरात ३.०० मी. रुंदीचे तात्पुरती शेडस् टॉयलेट करण्यास परवानगी देणेत येत आहे. याबाबत पुरेशी व्यवस्था न केल्यास जोता लेव्हलचे पुढील काम करणेस परवानगी देता येणार नाही. तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करणेपूर्वी सदर शेड स्वखर्चाने काढुन टाकणेत यावी.

बांधकाम सुरु करताना कामाचे नाव, बांधकाम परवानगीची तारीख, वास्तुविशारदाचे नांव, जमिन मालकाचे नांव, ठेकेदाराचे नांव, बांधकाम क्षेत्र इ. बाबी दर्शविणारा फलक लावण्यात यावा. महानगरपालिकेस माहीतीसाठी ठेकेदाराचे नाव व दुरध्वनी क्रमांक इ. बाबतचा तपशिल काम सुरु केल्यानंतर या कार्यालयास पाठविण्यात यावा ही विनंती.

**अटी** :-

१) प्रस्तुत भूखंडावरील इमारतीचे बांधकाम करीत असतांना बांधकामामुळे आजुबाजुच्या नागरीकांना प्रदुषणाचा त्रास होणार नाही तसेच बांधकाम प्रगतीपथावर असताना बांधकामावरील मजूर अथवा सभोवतालच्या परिसरामधील नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी National Building Code मधील तरतुदींचे तसेच अनुषंगीक कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन / अंमलबजावणी करणे संबंधीत भूखंडधारक / विकासकांवर बंधनकारक राहिल. जर भविष्यात आपले मालकीच्या भूखंडावर चालु असलेल्या बांधकामामुळे जिवीत अथवा सार्वजनिक / खाजगी मालमत्तेस कुठल्याही प्रकारची हानी झाल्यास त्यास संबंधीत भूखंडधारक /विकासक हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

२) प्रस्तुत भूखंडावर भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करणेपूर्वी आपले भूखंडाचे आजुबाजुस असणा-या सार्वजनिक स्वरुपाचे पदपथ, रस्ते, गटारे, जलवाहिन्या, मलनिःस्सारण वाहिन्या इत्यादी बाबीस काही हानी पोहोचले असल्यास सदर बाबी पुर्ववत करण्याची सर्वस्वी जबाबदारी भूखंडधारकाची /विकासकाची राहील अन्यथा भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३) आपण आपले नियोजित इमारतीचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु करण्यापुर्वी कामगारांच्या कुटुंबामधील ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुले प्राथमिक शिक्षणापासुन वंचित राहु नये या दृष्टीने त्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध होत असल्याची खातरजमा करणे अनिवार्य आहे. तशाप्रकारे कामगारांच्या कुटुंबाची व्यवस्था करण्याची आपली अथवा आपले द्वारा नियुक्त केलेल्या कंत्राटदाराची सर्वस्वी जबाबदारी आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

४) प्रस्तावित बांधकाम क्षेत्र २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त असल्याने केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (Environment clearance) व सुधारित रेल्वे विभागाचा ना हरकत दाखला जोता तपासणीपुर्वी सादर करणे बंधनकारक आहे.

५) सिडकोच्या भाडेकरारनामा, सुधारीत भाडेकरारनाम्यामधील अटी/शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

६) शासनाचे व नवी मुंबई महानगरपालिकेचे कोविड-१९ बाबतचे वेळोवेळी प्राप्त होणा-या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणेच्या अटीस अधिन राहून बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

७) प्रस्तुत प्रकरणात सादर करण्यात आलेली कुठलीही माहिती / कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची परवानगी आपोआप रद्द होईल.

८) प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अनुषंगाने AAI कडील उंची बाबत वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश आपल्यावर बंधनकारक राहतील.

९) आपण मागणी केल्यानुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.टिपीएस-१८२०/अनौ-२७/प्र.क्र.८०/२०/नवि-१३, दि.१४/०१/२०२१ अन्वये प्रचलित एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणाऱ्या अधिमुल्यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात आली असुन त्याअनुषंगाने सदर शासन निर्णयातील अटीचे पालन करणे आपणावर बंधनकारक राहील.

आपली,

(**ज्योती कवाडे**)
सहाय्यक संचालक, नगररचना (अ.का.)
नवी मुंबई महानगरपालिका

**प्रत माहितीसाठी** :-

१. मे. **ट्रायआर्च डिझाईन स्टुडिओ**, वास्तुविशारद,
१८, भुखंड क्र.१९, सेक्टर क्र. ११, बेलापूर , नवीमुंबई.
२. व्यवस्थापक शहर सेवा, सिडको लि.
३. उपआयुक्त (उपकर), नमुंमपा.
४. सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, घणसोली, नमुंमपा.

**NAVI MUMBAI MUNICIPAL CORPORATION**
**AMENDED COMMENCEMENT CERTIFICATE**

**NO.NMMC/TPO/BP/Case No. 20211CNMMC18491/538/ 2022** **DATE : 25 /02/2022**

The Unified Development Control & Promotional Regulation has been sanctioned by the Govt. vide Notification dt. 2nd December 2020, which is also applicable to NMMC & came in to force with the effect of 3rd December 2020, Permission is herby granted under Section 45(1) (iii) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 and Section 253 & 254 of the Bombay Provincial Municipal Corporation Act, 1949, **M/S. Thalia And Gami Enterprises Through Partners ( Mr.Murji Bhanji Gami), Plot No.17 & 18, Sector 02, Ghansoli, Navi Mumbai**. As per the approved plans and subject to the following conditions for the development work of the proposed Building.

| | | |
|---|---|---|
| **Plot Area** | : | **4860.000m$^2$** |
| **Permissible F.S.I.** | : | **5.664** |
| **Permissible BUA** | : | **27529.598 m$^2$** |
| **Built up area proposed (Residential)** | : | **24633.838 m$^2$** |
| **Built up area proposed (Commercial)** | : | **2884.285 m$^2$** |
| **Total Built up area proposed** | : | **27518.123 m$^2$** |
| **No. Of Unit** | : | **Residential – 244 Units** |
| | : | **Commercial – 33 Units** |
| | : | **Hospital – 02 Units** |

1) The Certificate is liable to be revoked by the Corporation if :

a) The development work in respect of which permission is granted under this Certificate is not carried out or the use there of is not in accordance with the sanctioned plans.

b) Any of the conditions subject to which the same is granted or any of the restrictions imposed by the Corporation is contravened.

c) The Municipal Commissioner is satisfied that the same is obtained by the Applicant through fraud & misrepresentation and the Applicant and / or any person deriving title through or under him, in such and event shall be deemed to have carried out the development work in contravention of Section 43 or 45 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

2) **THE APPLICANT SHALL :**

a) Give a notice to the Corporation on completion up to plinth level and 7 days before the commencement of the further work

b) Give written notice to the Municipal Corporation regarding completion of work.

c) Obtain an Occupancy Certificate from the Municipal Corporation.

3) Allow the Officers of the Municipal Corporation to enter the building or premises for which the permission has been granted at any time for the purpose of enforcing the building control Regulations and conditions of this Certificate.

The structural design, building materials, plumbing services, fire protection, electrical installation etc. shall be in accordance with the provision (except for provision in respect of floor area ration) as prescribed in the National Building Code amended from time to time by the Indian Standard institutions.

4) The Certificate shall remain valid for a period of **one year** from the date of issue and can be further revalidated as required under provision of Section M.R. & T. P. Act, 1966. This Commencement Certificate is renewable every year but such extended period shall be in no case exceed three years provided further that such lapse shall not be any subsequent

---2

applicant for fresh permission under Section 44 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

5) The condition of this Certificate shall not be binding not only on the Applicant but also its successors and every person deriving title through or under them

6) A certified copy of the approved plans shall be exhibited on site and the Name Board showing name of Owner, Architect, Builder & Structural Engineer, Ward No., Sector No., Plot No., Survey No., Area of Plot No., of flats, Built-up Area, Commencement Certificate No. & Date shall be installed on site.

7) The plot boundaries shall be physically demarcated immediately and the intimation be given to this section before completion of plinth work.

8) The amount of S.D. **Rs.7,23,215/-** S.D. **Rs. 97,200/-** for Mosquito Prevention's **Rs. 97,200/-** for debris & S.D. **Rs.24,500/-** for Tree Plantation deposited with NMMC as Security Deposit shall be forfeited either in whole or in part at the absolute discretion of the corporation for breach of any other Building Control Regulation and condition attached to the permission covered by the Commencement Certificate. Such a forfeiture shall be without prejudice to any other remedy or right of the Municipal Corporation.

9) You shall provide overhead water tank on building & underground water tank in two compartments. On for drinking water & another for other than drinking water. It should confirm to the standards applicable in this behalf.

10) You should approach to the Executive Engineer, M.S.E.B. for the power requirement location of transformer if any, etc.

11) Every plot of land shall have at least 1 tree for every 100 Sq. M. or part thereof of the plot area.

12) Applicant / Architect should strictly follow all the conditions of lease agreement. Owner & Architect will be held responsible for breach of any condition of lease Agreement of CIDCO.

13) The Owner & the Architect and Structural Engineer concerned are fully responsible for the construction quality of the building as per approved building plan. Structural design, Stability building construction quality, which should confirm to withstand an earthquake of highest intensity in seismic zone IV.

14) The Occupancy Certificate for the proposed building will not be granted unless the house Drainage lines are connected to the Municipal Main Sewer lines to the satisfaction of Municipal Authority as well as Plantation of trees and provision of garbage bin on the site.

15) Application for completion /occupation Certificate shall be accompanied with the plan as per construction done on the site.

16) Area of required parking spaces as shown in approved plan should be marked with the material of permanent nature with numbering.

17) The building material in reconstruction case or soil removed from the trenches should not be dumped or stored on municipal road. It should be dumped or stored on site as would be decided by the concern Ward Officers of Navi Mumbai Municipal Corporation.

NO.NMMC/TPO/BP/Case No. 20211CNMMC18491/ 538/ 2022 DATE : 25/02/2022

18) The building constructed should not be occupied without obtaining Occupation Certificate. Otherwise it will be treated as unauthorized use and necessary action as per law will be taken.

19) The applicants should fulfill all the health related provisions mentioned in the "Implementation of Ant larval & Mosquito Prevention Activities during and after construction and Tree Authority Bye-Laws 1966" The special mention is for mosquito prevention activities, construction of over-head tanks, debris removal and the sanitary conditions of drainage etc.

20) **The construction work shall be completed before dated 15/10/2023 as per condition mentioned in CIDCO Agreement dated 16/10/2019 and must be applied for Occupancy Certificate with all concerned NOC.**

21) The Owner & the architect are fully responsible for any Ownership. Area & Boundary disputes. In case of any dispute Navi Mumbai Municipal Corporation will not be responsible.

22) The Owner & the Architect and Structural Engineer concerned area instructed to strictly adhere to the conditions of amended FIRE NOC issued vide NMMC/FIRE /H.O./VASHI/ 5471 /2021 dated 06/12/2021 by Divisional Fire officer, NMMC.

23) Temporary Labor sheds with proper toilet arrangement shall be provided on the site.

24) F.S.I. Calculation submitted in the drawings shall be as per UDCPR Maharashtra State. If any discrepancy observed, the Architect will be held responsible and liable for necessary action.

25) The area shown open to sky on the ground floor plan should not be so used as would disturb the maneuvering of the vehicles required to be parked in the parking spaces shown in the plan.

(Jyoti Kawade)
Assistant Director of Town Planning (A.C.)
Navi Mumbai Municipal Corporation